MOTION FOR DISAPPROVAL OF ORDINANCE NO. III OF 2011
(AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923) AND L.A. BILL No. II OF 2011 (A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923).

**उपाध्यक्ष** : अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, अबु आझमी, एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), संजय भेगडे, प्रा. राम शिंदे, सर्वश्री. राजकुमार बडोले, नाना पटोले, गिरीश बापट, सुधीर मुनगंटीवार, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रमोद जठार, प्रकाश शेंडगे, संभाजी पवार, बाळा नांदगांवकर, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री. धैर्यशील पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. महादेव बाबर, चंद्रकांत मोकाटे, राजन साळवी, सदानंद चव्हाण, सुभाष देसाई, प्रकाश (बाळा) सावंत, रूपेश म्हात्रे, राजन विचारे, चिमणराव पाटील, आर.एम.वाणी, श्रीमती मीरा रेंगे-पाटील, सर्वश्री. संजय जाधव, ओमराजे निंबाळकर, संजय शिरसाट, संतोष सांबरे, विवेक पंडित, नानाजी शामकुळे, रशिद ताहीर मोमीन, चंद्रशेखर बावनकुळे, कॅ. अभिजीत अडसूळ, सर्वश्री. प्रमोद जठार, रवींद्र चव्हाण यांचा प्रस्ताव आहे, त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**श्री. बाळासाहेब थोरात** (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक - २ मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

**श्री. गिरीष बापट** : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी विधेयकाची व्याप्ती सांगितली पाहिजे. विधेयकामुळे होणारे परिणाम, दुष्परिणाम, हे विधेयक का आणावे लागले, या संदर्भात माहिती दिली पाहिजे नाही तर आम्हाला भाषण करावे लागेल. आपण मार्गदर्शन केले तर आम्ही दोन तासांत हे विधेयक संमत करू.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयकाच्या १ (क) मध्ये चित्रपटगृहांवर करमणूक शुल्क आकारण्यासंदर्भातील तरतूद आहे. त्यामध्ये आपण प्रवेशमूल्यावर २५ टक्के करमणूक कर आकारणी करतो. पण कलम ३ (१), (ब) मध्ये लाईव्ह शोच्या तिकिटांच्या एकूण किमतीवर करमणूक शुल्क आकारतो. या दोन्हीमध्ये जी विसंगती होती, ती दूर करण्याकरिता हे विधेयक आणलेले आहे. एक तर प्रवेशमूल्यावर २५ टक्के कर आणि एकत्रित मूल्यावर कर, अशा प्रकारची विसंगती निर्माण झाली होती. ती दूर करण्याचा प्रयत्न या माध्यमातून आपण करीत आहोत. हे अतिशय चांगल्या प्रकारचे विधेयक आहे. यामुळे विसंगती दूर होणार आहे. केवळ आकारणीच्या पध्दतीत आपण फरक करीत आहोत. त्यामुळे सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**श्री. देवेंद्र फडणवीस** (नागपूर दक्षिण-पश्चिम) : अध्यक्ष महोदय, अशा स्वरूपाचे एक विधेयक यापूर्वीही सभागृहात मांडण्यात आले होते. पुन्हा ते सभागृहात का आणावे लागले, याचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सध्या आपण पूल सेंटरवर करमणूक कर आकारतो. या पूल सेंटरमध्ये खेळ खेळला जातो. त्यामुळे तो करमणुकीचा भाग नाही. त्यामधून शासनाला फारसा महसूलही मिळत नाही. पण काही काही ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना असे वाटते की, जिल्ह्याचा महसूल वाढविला पाहिजे. म्हणून मग ते रेट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टने पूल सेंटरवर करमणूक कराची आकारणी करतात. आज शक्य नसले तरी भविष्यात पूल सेंटरवर आकारण्यात येणारा करमणूक कर मागे घेण्याबाबत विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, कर आकारणीमध्ये जी विसंगती होती, ती दूर करण्यासाठी हे विधेयक पुन्हा सभागृहासमोर आणण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पूल सेंटरबाबत केलेल्या विनंतीबाबत निश्चितपणे विचारांती निर्णय घेण्यात येईल.

**श्री. गिरीष बापट** (कसबापेठ) : अध्यक्ष महोदय, आमची अशी अपेक्षा होती की, या विधेयकाबाबत माननीय महसूल मंत्री अधिक विस्तृतपणे माहिती देतील. कारण, आमची अल्पबुध्दी असल्यामुळे व आवाका नसल्यामुळे महिलांच्या संदर्भातील विधेयक, करमणूक कराच्या संदर्भातील विधेयक या मागील उद्देश चटकन आमच्या लक्षात येत नाही.

अध्यक्ष महोदय, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालयात करमणूक शाखा असते. ही संपूर्ण शाखा मॅनेज झालेली आहे. मी यापूर्वीदेखील हा मुद्दा उपस्थित केला होता. रेसकोर्सच्या माध्यमातून १ लाख रुपये कर जमा होण्याची आवश्यकता असतांना केवळ ५-१० हजार रुपये कर जमा होतो. परवा पुणे येथील प्रभात टॉकीजमध्ये एक छापा घालण्यात आला. हा छापा निर्मात्यांनी सांगितला म्हणून घातला गेला, शासनाच्या अंमलबजावणी यंत्रणेने दक्षता घेतली म्हणून तो घातला गेला नाही. त्या ठिकाणी दाखववायचा चार्ट वेगळा आणि प्रत्यक्षात मोजलेल्या माणसांची संख्या वेगळी होती. त्यामुळे करमणूक शाखा अत्यंत दुबळी, मॅनेज झालेली, कंटाळवाणी आणि काम न करणारी आहे. या राज्याचे कर्ज फेडण्यासाठी महसूल विभाग सगळ्यात जास्त कर जमा करू शकतो. पण सगळ्यात कमी कर महसूल विभागाकडून जमा होतो. याबाबतीत महसूल विभाग काय करणार आहे ?

अध्यक्ष महोदय, दुसरे असे आहे की, एखाद्या शोचे तिकिट २५, ५००, ५००० रुपये असेल तर एकत्रित करमणूक कराची आकारणी म्हणून सगळ्या शो साठी जेवढी तिकिटे विकली जातील, त्या रकमेवर आकारणी करण्यात येणार आहे का ? त्यामुळे एकूण विक्रीवर कर आकारणी होणार आहे की, तिकिटांच्या दराप्रमाणे कर आकारणी होणार आहे, याबाबतचा खुलासा कृपया मंत्री महोदयांनी करावा. ज्याप्रमाणे दुकानात, हॉटेलमध्ये गेल्यानंतर आपले जेवढे बिल होते त्यावर साडेबारा टक्के व्हॅटची आकारणी होते. मग ५० रुपयांचे बिल झाले तरी साडेबारा टक्के आणि ५००० रुपयांचे बिल झाले तरी साडेबारा टक्के कराची आकारणी होते. त्या दिवशी हॉटेलची जेवढी विक्री होईल, त्या एकत्रित रकमेवर कर आकारणी होत नाही. या विधेयकाच्या माध्यमातून कशा पद्धतीने कर आकारणी करण्यात येणार आहे, याची माहिती कृपया त्यांनी द्यावी.

[ श्री. गिरीष बापट ]

अध्यक्ष महोदय, करमणूक कराच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहेत. तत्कालीन महसूल मंत्र्यांनी मला असे आश्वासन दिले होते की, एक बैठक जिल्हास्तरावर आयोजित करण्यात येईल. माननीय मंत्र्यांवर कामाचा एवढा ताण आहे की, मंत्र्यांनी या बैठकीला हजर असले पाहिजे, अशी अपेक्षा आम्ही ठेवणार नाही. परंतु, ही बैठक झाली पाहिजे, अशी आमची विनंती आहे. त्यामध्ये किती कर आपण मिळवू शकतो, हे आम्ही सांगू शकतो.

अध्यक्ष महोदय, थिएटर, नाट्यगृहे यांचे तिकिटांचे दर ठरलेले असतात. पण जे लाईव्ह शो होतात, म्हणजे गाण्याचा कार्यक्रम झाला तर पहिले तिकीट २०००, ३००० रुपयांचे असते आणि जे मागे बसतात त्यांचे २५ रुपयांचे तिकीट असते. तेव्हा, मंत्री महोदयांनी या दोन्ही बाबीचा खुलासा करावा, अशी मी विनंती करतो. या तिकिटाच्या दराप्रमाणे नवीन कर आकारणी होणार आहे किंवा कसे हे मंत्री महोदयांनी समजावून सांगावे.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, करमणूक कराबाबत राज्य शासनाच्या वित्त विभागाची जबाबदारी आहे. ती अत्यंत योग्यरितीने पार पाडण्यात येत आहे.सन २००८-२००९ मध्ये २८३ कोटी रुपये, २००९-२०१० मध्ये ३२० कोटी रुपये महसूल गोळा झाला आहे. २०१०-२०११ मध्ये ४०१ कोटी रुपयांचा महसूल गोळा झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कर प्रणाली जास्त सक्षम बनविणे आवश्यक आहे, यासाठी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सर्व सूचना विचारात घेण्यात येतील. आवश्यकता भासल्यास सन्माननीय सदस्यांसोबत बैठक आयोजित करून त्यांच्या सूचना समजून घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे. प्रवेश मूल्य समजून घेतांना मी असे सांगेन की, चित्रपट गृहाच्या मालकाला जे प्रवेश मूल्य मिळते, त्याच्यावर आकारणी करण्यात येते. १०० रुपयावर २५ टक्केप्रमाणे २० रुपये मिळतात. यामध्ये एकत्रित फेसव्हॅल्यू तिकिटाच्या किंमतीवर आकारल्यामुळे शासन २५ रुपये घेते व मालकाला ७५ रुपये मिळतात. याचा परिणाम असा होतो की, ती आकरणी ३५ टक्के होते, ही विसंगती दूर करण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

**श्री. प्रविण दरेकर** (मागाठाणे) : अध्यक्ष महोदय, आता वेळ नसल्यामुळे या विधेयकावर मी भाषण करणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. गिरीश बापट यांनी सांगितले आहे की, हे करमणूक कराचे बिल आहे, मुंबई शहरात जे केबल ऑपरेटर आहेत, त्यातील पाच टक्के करणूकर करसुद्धा शासनाकडे गोळा होत नाही. मुंबई शहरात काही करोडो रुपये या कराच्या माध्यमातून येऊ शकतात. केबल ऑपरेटर करोडो रुपये कमवितात. मघाशी रेसकार्सच्या बुकीचे उदाहरण देण्यात आले. महसूल खाते, संबंधित अधिकारी, तहसीलदार व केबल ऑपरेटर यांचे संगनमत झालेले असते. त्यांचे वाटप ठरलेले असते. या विधेयकाच्या अनुषंगाने मुंबई शहरात एकूण किती केबल चालक आहेत, त्यांच्यापासून मिळणारा महसूल किती आहे. मुंबईत केबल वापरणाऱ्यांची संख्या किती आहे. याचा आढावा घेण्यात यावा. असा आढावा घेतला तर बऱ्याच गोष्टी शासनाच्या निदर्शनास येऊ शकतील.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, राज्याच्या हिताच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांच्या सूचना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्रातील केबलधारकांच्या संख्येचा आढावा घेण्यात येईल. त्या पासून करमणूक कराचे उत्पन्न वाढत असेल तर या संदर्भातील कार्यवाही निश्चितपणे करण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे, आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक-२ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक-२ संमत झाले.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन बुधवार, दिनांक १३ एप्रिल २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी बुधवार दिनांक १३ एप्रिल २०११ च्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---